स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा. क्र.विकसन/सुरक्षा/स्टॉल/नावात/बदल/ ४०३४ /२०२४-२०२५ दिनांक ३/०३/२०२५

**प्रसिध्दी पत्रक**

मुख्य बाजार आवारातील गुळ भुसार विभागातील फुलांचा बाजार विभागाच्या गेट क्र. २ च्या शेजारी टायर रिपेअरींगसाठी लांबी १२ फुट रुंदी ९.९ फुट आकाराचा स्टॉल पावती क्र. ५१९६ दिनांक ४/९/१९८७ ने सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम रूपये १३,०००/- चा भरणा केलेनंतर कै. वसंत विठ्ठल धुमाळ यांना स्टॉल लावणेस परवानगी देणेत आलेली होती. कै. वसंत धुमाळ यांचे दिनांक ११/०३/२०१८ रोजी निधन झालेमुळे व त्यांची पत्नी श्रीमती गजराबाई वसंतराव धुमाळ यांची वयोमानामुळे व प्रकृती सतत बिघडत असलेने सदर स्टॉलचे देखभाल करणे त्यांनी शक्य नसल्यामुळे सदर स्टॉल त्यांची मुलगी सौ. शारदा जयसिंगराव पासलकर (मयताशी नाते - मुलगी) यांचे नावे वर्ग करणेसाठी श्रीमती गजराबाई वसंतराव धुमाळ यांचे संमतीपत्र घेवून सदर स्टॉलच्या परवान्यातील नावामध्ये सौ. शारदा जयसिंगराव पासलकर असा दिनांक ८/७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये वर्ग करणेत आलेला आहे. सदर स्टॉल १) श्री. महेंद्र ज्ञानोबा चोरघे २) श्री. अनिल बाबुराव परदेशी यांचे नावावर वर्ग करणेबाबत करारनामा नोटरी करून त्यांनी दिनांक १८/१२/२०२४ रोजी बाजार समितीकडे अर्ज सादर केला आहे.

तरी सदर स्टॉलच्या नावात बदल करणेबाबत कोणाची काही तक्रार/ हरकत असल्यास, दिनांक १०/०३/२५ पावेतो बाजार समितीच्या कार्यालयामध्ये लेखी स्वरूपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/ हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**मा. सभापती साहेब यांच्या मान्यतेने**

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७